महाराष्ट्र शासन

क्रमांक :बीएनएम-५००७/३४४/प्र.क्र.८९/०७/नवि-३२.
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : ७ फेब्रुवारी, २००९.

प्रति,

१) सर्व महापौर.

२) सर्व महानगरपालिका आयुक्त.

३) प्रधान सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, मुंबई.

४) प्रधान सचिव (सहकार), सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.

५) सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.

६) सचिव (इमारती), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.

७) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई.

८) सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय.

९) सर्व जिल्हाधिकारी

१०) सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती यांचे मुख्याधिकारी.

११) प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालयाची सर्व खंडपीठे (यादीप्रमाणे).

१२) प्रबंधक, सर्व जिल्हा न्यायालये व राज्यातील इतर न्यायालये (यादीप्रमाणे).

१३) महासंचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, एम.एन.रॉय कॅम्पस, बांद्रे (पू.) मुंबई-५१.

१४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (व्यापक प्रसिध्दीसाठी).

विषय :- इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (Structural Audit) अनिवार्य करणेबाबत अधिनियमात सुधारणा.

महोदय,

मुंबई महानगरपालिका अधिनियम; मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९; नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ या अधिनियमांतर्गत ठराविक काळानंतर इमारतींचे मालक /

भोगवटादार यांनी रचनाकार अधिकाऱ्यांकडून इमारती तपासून घेणे आणि बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र प्राप्त करणे, त्याआधारे इमारतींचे रचनात्मक स्थैर्य प्राप्त करण्यासाठी दुरुस्ती बांधकाम करणे, इत्यादी तरतुदीकरीता अधिनियमात सुधारणा करणारा सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.६ ची प्रत आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

आपला,

( फ. ब. खान )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी सादरः
(अधिनियमाच्या प्रतींसह)

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव / सचिव.
२) मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव.
३) प्रधान सचिव (नगर विकास विभाग), मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.
४) सचिव (नगर विकास विभाग), मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.
५) नगर विकास विभागांतील सहसचिव / उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी.
६) वेब कोऑर्डिनेटर (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) निवडनस्ती (नवि-३२)

•••••••••••••

असा. क्र. ६ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**बुधवार, जानेवारी १४, २००९/पौष २४, शके १९३०**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.**—मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. .. | ४५-५३ |

दिनांक १४ जानेवारी २००९ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १४ जानेवारी २००९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २. १९६५ चा महा. ४०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकोणसाठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—



**[किंमत : रुपये १८.००]**

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (पाचवी सुधारणा) अधिनियम, २००८ असे म्हणावे.

## प्रकरण दोन

## मुंबई महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ यामध्ये कलम ३५३ब समाविष्ट करणे.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुंबई महानगरपालिका अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम ३५३अ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १८८८ चा मुंबई ३.

बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र.

" **३५३ब.** (१) ज्या इमारतीच्या संबंधात,—

(एक) महानगरपालिकेने समाप्ती प्रमाणपत्र दिल्याच्या दिनांकापासून ; किंवा

(दोन) कलम ३५३अ अन्वये इमारतीचा भोगवटा करण्यास परवानगी दिल्याच्या दिनांकापासून ; किंवा

(तीन) तिच्या बांधकाम क्षेत्राच्या किमान ५० टक्के इतक्या क्षेत्राचा प्रत्यक्ष भोगवटा केल्याच्या दिनांकापासून,

यांपैकी जो आधीचा असेल त्या दिनांकापासून तीस वर्षांचा कालावधी समाप्त झाला असेल, अशा इमारतीचा मालक किंवा भोगवटादार, इमारत मानवी वस्तीसाठी योग्य आहे, असे प्रमाणित करण्याच्या प्रयोजनांसाठी (यापुढे अशा प्रमाणपत्राचा निर्देश " बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र " असा करण्यात आला आहे) महानगरपालिकेकडे नोंदणी केलेल्या बांधकाम अभियंत्याकडून अशा इमारतीची तपासणी करवून घेईल अशा बांधकाम अभियंत्याने दिलेले बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र आयुक्ताकडे सादर करण्यात येईल.

(२) बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला तीस वर्षांचा कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून आणि त्यानंतर प्रत्येक दहा वर्षांचा कालावधी किंवा त्या इमारतीची स्थिती आणि मालकाने किंवा भोगवटादाराने केलेल्या दोषनिवारक दुरुस्त्या लक्षात घेऊन आयुक्त निर्धारित करील असा कमी कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत सादर करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, आयुक्तास, कारणे लेखी नमूद केल्यानंतर, कोणत्याही वेळी, कोणत्याही इमारतीची बांधकाम अभियंत्याकडून तपासणी करवून घेण्याचे आणि निदेश दिल्याच्या दिनांकापासून आयुक्ताने निदेशात नमूद केलेल्या तीस दिवसांपेक्षा जास्त नसेल अशा कालावधीच्या आत, पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र आयुक्ताला सादर करण्याचे निदेश इमारतीच्या मालकाला किंवा भोगवटादाराला देता येतील.

(४) बांधकाम अभियंता, जर इमारतीचे बांधकाम सुस्थितीत असल्याचे निश्चित करण्यासाठी कोणत्याही दोषनिवारक दुरुस्त्यांच्या शिफारशी करील तर, आयुक्ताचे समाधान होईपर्यंत इमारतीच्या मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून अशा दोषनिवारक दुरुस्त्या करण्यात येतील.

(५) बांधकाम अभियंत्याच्या अहवालाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत जो मालक किंवा, यथास्थिति, भोगवटादार, बांधकाम सुस्थितीत असल्याचे निश्चित करण्यासाठी दोषनिवारक दुरुस्त्या करण्यात कसूर करील अशा कोणत्याही मालकास किंवा यथास्थिति, भोगवटादारास कलम ४७१ मध्ये तरतूद केलेल्या दंडाची शिक्षा करण्यात येईल.

(६) पोट-कलम (५) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असेल तरी, आयुक्तास, मालकाला किंवा भोगवटादाराला लेखी नोटीस दिल्यानंतर, नोटीशीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत इमारतीची बांधकामविषयक सुस्थिती प्राप्त करण्यासाठी, दोषनिवारक दुरुस्त्या करण्यास त्याला फर्माविता येईल. जर मालक किंवा भोगवटादार उक्त कालावधीच्या आत, अशा दोषनिवारक दुरुस्त्या करण्यात कसूर करील तर, आयुक्तास, त्या दोषनिवारक दुरुस्त्या करता येतील आणि अशा दुरुस्त्यांवर आयुक्ताने केलेला खर्च, त्याची मागणी केल्यानंतर तीस दिवसांच्या आत भरणा न केल्यास, मालमत्ता कराच्या थकबाकीप्रमाणे मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून वसूल करण्यात येईल.

(७) पोट-कलम (६) अन्वये खर्चाच्या ज्या रकमेची मागणी करण्यात आली असेल त्या रकमेविषयी कोणताही विवाद असेल तर, मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय यांच्याकडे अपील करता येईल, परंतु,—

(एक) अशा मागणीची नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत ते अपील दाखल करण्यात आले नसेल तर ;

(दोन) मागणी करण्यात आलेली रक्कम महानगरपालिकेकडे जमा करून अशाप्रकारे रक्कम जमा करण्यात आल्याबाबतच्या पावतीची सत्यप्रत अपिलासोबत जोडण्यात आली नसेल तर, उक्त मुख्य न्यायाधीश असे कोणतेही अपील विचारार्थ स्वीकारणार नाही.

(८) जर अपिलावर अपीलकर्त्याच्या बाजूने निर्णय देण्यात आला असेल आणि महानगरपालिकेकडे जमा करण्यात आलेली खर्चाची रक्कम ही, अपीलकर्त्याने द्यावयाच्या रकमेपेक्षा अधिक असेल तर, आयुक्त, ती जादा रक्कम अपीलकर्त्याने ती अशाप्रकारे जमा केल्याच्या दिनांकापासून दर साल दर शेकडा ६.२५ टक्के व्याजासह अशा इमारतीच्याबाबतीत मालकाने त्यानंतर द्यावयाचा मालमत्ता कर म्हणून समायोजित करील.".

**३.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४७१ च्या तक्त्यामध्ये, नोंद क्रमांक ८५ नंतर, पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईल :— सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४७१ ची सुधारणा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| "८५अ. | कलम ३५३ब | बांधकाम सुस्थितीबाबत तरतुदी. | पंचवीस हजार रुपये किंवा इमारतीच्या एका वर्षाच्या कालावधीच्या मालमत्ता कराएवढी रक्कम, यापैकी जी अधिक असेल ती रक्कम. | पंचवीस हजार रुपये किंवा इमारतीच्या एका वर्षाच्या कालावधीच्या मालमत्ता कराएवढी रक्कम, यापैकी जी अधिक असेल ती रक्कम.". |

## प्रकरण तीन

## मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याची सुधारणा.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ यामध्ये कलम २६५अ समाविष्ट करणे.

**४.** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "प्रांतिक महानगरपालिका अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम २६५ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९४९ चा मुंबई ५९.

बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र.

"**२६५अ.** (१) कलम २६५ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या इमारतीच्या संबंधात,—

(एक) महानगरपालिकेने समाप्ती प्रमाणपत्र दिल्याच्या दिनांकापासून ; किंवा

(दोन) कलम २६३ अन्वये इमारतीच्या भोगवटा करण्यास परवानगी दिल्याच्या दिनांकापासून ; किंवा

(तीन) तिच्या बांधकाम क्षेत्राच्या किमान ५० टक्के इतक्या क्षेत्राचा प्रत्यक्ष भोगवटा केल्याच्या दिनांकापासून,

यापैकी जो आधीचा असेल त्या दिनांकापासून तीस वर्षांचा कालावधी समाप्त झाला असेल, अशा इमारतीचा मालक किंवा भोगवटादार, इमारत मानवी वस्तीसाठी योग्य आहे, असे प्रमाणित करण्याच्या प्रयोजनांसाठी (यापुढे अशा प्रमाणपत्राचा निर्देश " बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र " असा करण्यात आला आहे) महानगरपालिकेकडे नोंदणी केलेल्या बांधकाम अभियंत्याकडून अशा इमारतीची तपासणी करवून घेईल अशा बांधकाम अभियंत्याने दिलेले बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र आयुक्ताकडे सादर करण्यात येईल.

(२) बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला तीस वर्षांचा कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून, आणि त्यानंतर प्रत्येक दहा वर्षांचा कालावधी किंवा त्या इमारतीची स्थिती आणि मालकाने किंवा भोगवटादाराने केलेल्या दोषनिवारक दुरुस्त्या लक्षात घेऊन, आयुक्त निर्धारित करील असा कमी कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत सादर करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, आयुक्तास, कारणे लेखी नमूद केल्यानंतर, कोणत्याही वेळी, कोणत्याही इमारतीची बांधकाम अभियंत्याकडून तपासणी करवून घेण्याचे आणि निदेश दिल्याच्या दिनांकापासून आयुक्ताने निदेशात नमूद केलेल्या तीस दिवसांपेक्षा जास्त नसेल अशा कालावधीच्या आत, या पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र आयुक्ताला सादर करण्याचे निदेश इमारतीच्या मालकाला किंवा भोगवटदाराला देता येतील.

(४) बांधकाम अभियंता, जर इमारतीचे बांधकाम सुस्थितीत असल्याचे निश्चित करण्यासाठी कोणत्याही दोषनिवारक दुरुस्त्यांच्या शिफारशी करील तर, आयुक्ताचे समाधान होईपर्यंत इमारतीच्या मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून अशा दोषनिवारक दुरुस्त्या करण्यात येतील.

(५) बांधकाम अभियंत्याच्या अहवालाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत, जो मालक किंवा, यथास्थिति, भोगवटादार, बांधकाम सुस्थितीत असल्याचे निश्चित करण्यासाठी दोषनिवारक दुरुस्त्या करण्यात कसूर करील अशा कोणत्याही मालकास किंवा, यथास्थिति, भोगवटादारास, कलम ३९८अ मध्ये तरतूद केलेल्या दंडासह शिक्षा करण्यात येईल.

(६) पोट-कलम (५) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आयुक्तास, मालकाला किंवा भोगवटादाराला लेखी नोटीस दिल्यानंतर, नोटीशीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत इमारतीची बांधकामविषयक सुस्थिती प्राप्त करण्यासाठी, दोषनिवारक दुरुस्त्या करण्यास त्याला फर्माविता येईल. जर मालक किंवा भोगवटादार उक्त कालावधीच्या आत, अशा दोषनिवारक दुरुस्त्या करण्यात कसूर करील तर, आयुक्तास, त्या दोषनिवारक दुरुस्त्या करता येतील आणि अशा दुरुस्त्यांवर आयुक्ताने केलेला खर्च, त्याची मागणी केल्यानंतर तीस दिवसांच्या आत भरणा न केल्यास, मालमत्ता कराच्या थकबाकीप्रमाणे मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून वसूल करण्यात येईल.

(७) पोट-कलम (६) अन्वये खर्चाच्या ज्या रकमेची मागणी करण्यात आली असेल त्या रकमेविषयी कोणताही विवाद असेल तर, या अधिनियमाच्या कलम ४०६ खालील ज्या न्यायाधीशाकडे अपील दाखल करण्यात येते यांच्याकडे अपील करता येईल, परंतु,—

(एक) अशा मागणीची नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत ते अपील दाखल करण्यात आले नसेल तर ;

(दोन) मागणी करण्यात आलेली रक्कम महानगरपालिकेकडे जमा करून अशाप्रकारे रक्कम जमा करण्यात आल्याबाबतच्या पावतीची सत्यप्रत अपिलासोबत जोडण्यात आली नसेल तर, असा न्यायाधीश असे कोणतेही अपील विचारार्थ स्वीकारणार नाही.

(८) जर अपिलावर अपीलकर्त्याच्या बाजूने निर्णय देण्यात आला असेल आणि महानगरपालिकेकडे जमा करण्यात आलेली खर्चाची रक्कम ही, अपीलकर्त्याने द्यावयाच्या रकमेपेक्षा अधिक असेल तर, आयुक्त, ती जादा रक्कम अपीलकर्त्याने ती अशाप्रकारे जमा केल्याच्या दिनांकापासून दर साल दर शेकडा ६.२५ टक्के व्याजासह अशा इमारतीच्याबाबतीत मालकाने त्यानंतर द्यावयाचा मालमत्ता कर म्हणून समायोजित करील.".

**५.** प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३९८ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ यामध्ये कलम ३९८अ समाविष्ट करणे.

"**३९८अ.** जो कोणी, कलम २६५अ च्या तरतुदींचे उल्लंघन करील त्यास, पंचवीस हजार रुपये किंवा संबंधित इमारतीच्या मालमत्ता कराएवढी रक्कम, यापैकी जी अधिक असेल इतक्या रकमेच्या दंडाची शिक्षा करण्यात येईल.".

कलम २६५अ च्या उल्लंघनाबद्दलची शिक्षा.

## प्रकरण चार

## नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याची सुधारणा.

सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ यामध्ये कलम २८६अ समाविष्ट करणे.

**६.** नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (यात यापुढे ज्याचा निर्देश " नागपूर महानगरपालिका अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम २८६ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र.

" **२८६अ.** (१) ज्या इमारतीच्या संबंधात,—

(एक) महानगरपालिकेने समाप्ती प्रमाणपत्र दिल्याच्या दिनांकापासून ; किंवा

(दोन) कलम २८० अन्वये इमारतीचा भोगवटा करण्यास परवानगी दिल्याच्या दिनांकापासून ; किंवा

(तीन) तिच्या बांधकाम क्षेत्राच्या किमान ५० टक्के इतक्या क्षेत्राचा प्रत्यक्ष भोगवटा केल्याच्या दिनांकापासून,

यांपैकी जो आधीचा असेल त्या दिनांकापासून तीस वर्षांचा कालावधी समाप्त झाला असेल, अशा इमारतीचा मालक किंवा भोगवटादार, इमारत मानवी वस्तीसाठी योग्य आहे, असे प्रमाणित करण्याच्या प्रयोजनांसाठी (यापुढे अशा प्रमाणपत्राचा निर्देश ''बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र'' असा करण्यात आला आहे) महानगरपालिकेकडे नोंदणी केलेल्या बांधकाम अभियंत्याकडून अशा इमारतीची तपासणी करवून घेईल. अशा बांधकाम अभियंत्याने दिलेले बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र आयुक्ताकडे सादर करण्यात येईल.

(२) बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला तीस वर्षांचा कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून, आणि त्यानंतर प्रत्येक दहा वर्षांचा कालावधी किंवा त्या इमारतीची स्थिती आणि मालकाने किंवा भोगवटादाराने केलेल्या दोषनिवारक दुरुस्त्या लक्षात घेऊन, आयुक्त निर्धारित करील असा कमी कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत सादर करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, आयुक्तास, कारणे लेखी नमूद केल्यानंतर, कोणत्याही वेळी, कोणत्याही इमारतीची बांधकाम अभियंत्याकडून तपासणी करवून घेण्याचे आणि निदेश दिल्याच्या दिनांकापासून आयुक्ताने निदेशात नमूद केलेल्या तीस दिवसांपेक्षा जास्त नसेल अशा कालावधीच्या आत, या पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र आयुक्ताला सादर करण्याचे निदेश इमारतीच्या मालकाला किंवा भोगवटादाराला देता येतील.

(४) बांधकाम अभियंता, जर इमारतीचे बांधकाम सुस्थितीत असल्याचे निश्चित करण्यासाठी कोणत्याही दोषनिवारक दुरुस्त्यांच्या शिफारशी करील तर, आयुक्ताचे समाधान होईपर्यंत इमारतीच्या मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून अशा दोषनिवारक दुरुस्त्या करण्यात येतील.

(५) बांधकाम अभियंत्याच्या अहवालाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत, जो मालक किंवा, यथास्थिति, भोगवटादार, बांधकाम सुस्थितीत असल्याचे निश्चित करण्यासाठी दोषनिवारक दुरुस्त्या करण्यात कसूर करील अशा कोणत्याही मालकास किंवा यथास्थिति, भोगवटादारास, कलम ४२१ च्या पोट-कलम (२) मध्ये तरतूद केलेल्या दंडाची शिक्षा करण्यात येईल.

(६) पोट-कलम (५) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आयुक्तास, मालकाला किंवा भोगवटादाराला लेखी नोटीस दिल्यानंतर, नोटीशीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत इमारतीची बांधकामविषयक सुस्थिती प्राप्त करण्यासाठी दोषनिवारक दुरुस्त्या करण्यास त्याला फर्माविता येईल. जर मालक किंवा भोगवटादार, उक्त कालावधीच्या आत अशा दोषनिवारक दुरुस्त्या करण्यात कसूर करील तर, आयुक्तास, त्या दोषनिवारक दुरुस्त्या करता येतील आणि अशा दुरुस्त्यांवर आयुक्ताने केलेला खर्च, त्याची मागणी केल्यानंतर तीस दिवसांच्या आत भरणा न केल्यास मालमत्ता कराच्या थकबाकीप्रमाणे मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून वसूल करण्यात येईल.

(७) पोट-कलम (६) अन्वये खर्चाच्या ज्या रकमेची मागणी करण्यात आली असेल त्या रकमेविषयी कोणताही विवाद असेल तर, जिल्हा न्यायालयाकडे अपील करता येईल, परंतु,—

(एक) अशा मागणीची नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत ते अपील दाखल करण्यात आले नसेल तर ;

(दोन) मागणी करण्यात आलेली रक्कम महानगरपालिकेकडे जमा करून अशाप्रकारे रक्कम जमा करण्यात आल्याबाबतच्या पावतीची सत्य प्रत अपिलासोबत जोडण्यात आली नसेल तर, असे न्यायालय असे कोणतेही अपील विचारार्थ स्वीकारणार नाही.

(८) जर अपीलावर अपीलकर्त्याच्या बाजूने निर्णय देण्यात आला असेल आणि महानगरपालिकेकडे जमा करण्यात आलेली खर्चाची रक्कम ही, अपीलकर्त्याने द्यावयाच्या रकमेपेक्षा अधिक असेल तर, आयुक्त, ती जादा रक्कम अपीलकर्त्याने ती अशाप्रकारे जमा केल्याच्या दिनांकापासून दर साल दर शेकडा ६.२५ टक्के व्याजासह अशा इमारतीच्याबाबतीत मालकाने त्यानंतर द्यावयाचा मालमत्ता कर म्हणून समायोजित करील.".

**७.** नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४२१ च्या पोट-कलम (२) मधील तक्त्यामध्ये, कलम २८०, पोट-कलम (४) संबंधीच्या नोंदीनंतर, पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईल :— सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ४२१ ची सुधारणा.

| | | |
|---|---|---|
| " २८६अ. | बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्राबाबतच्या तरतुदी. | पंचवीस हजार रुपये किंवा इमारतीच्या एका वर्षाच्या कालावधीच्या मालमत्ता कराएवढी रक्कम, यापैकी जी अधिक असेल ती रक्कम. ................". |

प्रकरण पाच

## महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याची सुधारणा.

१९६५ चा महा. ४०. **८.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम १९३ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० यामध्ये कलम १९३अ समाविष्ट करणे.

"**१९३अ.** (१) ज्या इमारतीच्या संबंधात,— बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र.

(एक) नगरपरिषदेने समाप्ती प्रमाणपत्र दिल्याच्या दिनांकापासून ; किंवा

(दोन) कलम १९३ अन्वये इमारतीचा भोगवटा करण्यास परवानगी दिल्याच्या दिनांकापासून; किंवा

(तीन) तिच्या बांधकाम क्षेत्राच्या किमान ५० टक्के इतक्या क्षेत्राचा प्रत्यक्ष भोगवटा केल्याच्या दिनांकापासून,

यांपैकी जो आधीचा असेल त्या दिनांकापासून तीस वर्षांचा कालावधी समाप्त झाला असेल, अशा इमारतीचा मालक किंवा भोगवटादार, इमारत मानवी वस्तीसाठी योग्य आहे, असे प्रमाणित करण्याच्या प्रयोजनांसाठी (यापुढे अशा प्रमाणपत्राचा निर्देश "बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र" असा करण्यात आला आहे) नगरपरिषदेकडे नोंदणी केलेल्या बांधकाम अभियंत्याकडून अशा इमारतीची तपासणी करवून घेईल अशा बांधकाम अभियंत्याने दिलेले बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र मुख्याधिकाऱ्याकडे सादर करण्यात येईल.

(२) बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र, पोट- कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला तीस वर्षांचा कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून, आणि त्यानंतर प्रत्येक दहा वर्षांचा कालावधी किंवा त्या इमारतीची स्थिती आणि मालेकाने किंवा भोगवटादाराने केलेल्या दोषनिवारक दुरुस्त्या लक्षात घेऊन, मुख्याधिकारी निर्धारित करील असा कमी कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत सादर करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मुख्याधिकाऱ्यास, कारणे लेखी नमूद केल्यानंतर, कोणत्याही वेळी, कोणत्याही इमारतीची बांधकाम अभियंत्याकडून तपासणी करवून घेण्याचे आणि निदेश दिल्याच्या दिनांकापासून मुख्याधिकाऱ्याने निदेशात नमूद केलेल्या, तीस दिवसांपेक्षा जास्त नसेल अशा कालावधीच्या आत, या पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र मुख्याधिकाऱ्याला सादर करण्याचे निदेश इमारतीच्या मालकाला किंवा भोगवटादाराला देता येतील.

(४) बांधकाम अभियंता, जर इमारतीचे बांधकाम सुस्थितीत असल्याचे निश्चित करण्यासाठी कोणत्याही दोषनिवारक दुरुस्त्यांच्या शिफारशी करील तर, मुख्याधिकाऱ्याचे समाधान होईपर्यंत इमारतीच्या मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून अशा दोषनिवारक दुरुस्त्या करण्यात येतील.

(५) बांधकाम अभियंत्याच्या अहवालाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत, जो मालक किंवा, यथास्थिति, भोगवटादार, बांधकाम सुस्थितीत असल्याचे निश्चित करण्यासाठी दोषनिवारक दुरुस्त्या करण्यात कसूर करील अशा कोणत्याही मालकास किंवा यथास्थिति, भोगवटादारास, पंचवीस हजार रुपये किंवा इमारतीच्या एका वर्षाच्या मालमत्ता कराएवढी रक्कम यांपैकी जी अधिक असेल इतक्या दंडाची शिक्षा करण्यात येईल.

(६) पोट-कलम (५) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मुख्याधिकाऱ्यास, मालकाला किंवा भोगवटादाराला लेखी नोटीस दिल्यानंतर, नोटीशीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत इमारतीची बांधकामविषयक सुस्थिती प्राप्त करण्यासाठी, दोषनिवारक दुरुस्त्या करण्यास त्याला फर्माविता येईल. जर मालक किंवा भोगवटादार, उक्त कालावधीच्या आत अशा दोषनिवारक दुरुस्त्या करण्यात कसूर करील तर, मुख्याधिकाऱ्यास, त्या दोषनिवारक दुरुस्त्या करता येतील आणि अशा दुरुस्त्यांवर मुख्याधिकाऱ्याने केलेला खर्च, त्याची मागणी केल्यानंतर तीस दिवसांच्या आत भरणा न केल्यास, मालमत्ता कराच्या थकबाकीप्रमाणे मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून वसूल करण्यात येईल.

(७) पोट-कलम (६) अन्वये ज्या खर्चाच्या रकमेची मागणी करण्यात आली असेल त्या रकमेबाबत कोणताही विवाद असेल तर, मालकाला, या अधिनियमांच्या कलम १६९ मधील

पोट-कलम (२) खाली गठीत केलेल्या मालमत्ता कर अपील समितीकडे अपील दाखल करता येईल, परंतु,—

(एक) अशा मागणीची नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत ते अपील दाखल करण्यात आले नसेल तर ;

(दोन) ज्या रकमेची मागणी करण्यात आली असेल ती रक्कम नगरपरिषदेकडे जमा करण्यात आली असेल आणि अशा प्रकारे रक्कम जमा करण्यात आल्याचे दर्शविणाऱ्या पावतीची सत्य प्रत अपिलासोबत जोडण्यात आली नसेल तर,—

उक्त समिती असे कोणतेही अपील विचारार्थ स्वीकारणार नाही.

(८) जर अपिलावर अपीलकर्त्याच्या बाजूने निर्णय देण्यात आला असेल आणि नगरपरिषदेकडे जमा करण्यात आलेली खर्चाची रक्कम ही, अपीलकर्त्याने द्यावयाच्या रकमेपेक्षा अधिक असेल तर, मुख्याधिकारी, ती जादा रक्कम अपीलकर्त्याने ती अशाप्रकारे जमा केल्याच्या दिनांकापासून दर साल दर शेकडा ६.२५ टक्के व्याजासह अशा इमारतीच्याबाबतीत मालकाने त्यानंतर द्यावयाचा मालमत्ता कर म्हणून समायोजित करील.".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

अंसा. क्र. ६

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**बुधवार, जानेवारी १४, २००९/पौष २४, शके १९३०**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Municipal Corporations and Municipal Councils (Fifth Amendment) Act, 2008 (Mah. Act No. VI of 2009), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. VI OF 2009.

*(First published after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 14th January 2009).*

An act further to amend the Mumbai Municipal Corporation Act, the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, the City of Nagpur Corporation Act, 1948 and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965.

Bom III of 1888. Bom LIX of 1949. C.P. and Berar II of 1950. Mah. XL of 1965.

WHEREAS it is expedient further to amend the Mumbai Municipal Corporation Act, the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, the City of Nagpur Corporation Act, 1948 and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Fifty-ninth Year of the Republic of India as follows :—



[**किंमत** : रुपये २०.००]

## CHAPTER I

PRELIMINARY.

Short title. **1.** This Act may be called the Maharashtra Municipal Corporations and Municipal Councils (Fifth Amendment) Act, 2008.

## CHAPTER II

AMENDMENTS TO THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.

Insertion of section 353B in Bom.III of 1888. **2.** After section 353A of the Mumbai Municipal Corporation Act (hereinafter referred to as "the Mumbai Corporation Act"), the following section shall be inserted, namely :— Bom. III of 1888.

Structural Stability Certificate. "**353B.** (*1*) Every owner or occupier of a building in respect of which a period of thirty years, from the date of,—

(*i*) issue of its completion certificate by the Corporation ; or

(*ii*) issue of permission to occupy a building under section 353A ; or

(*iii*) its physical occupation of at least 50 per cent. of its builtup area,

whichever is earlier, has expired, shall cause such building to be examined by a Structural Engineer registered with the Corporation for the purposes of certifying that the building is fit for human habitation (such certificate hereinafter referred to as "the Structural Stability Certificate"). The Structural Stability Certificate issued by such Structural Engineer shall be submitted to the Commissioner.

(*2*) The Structural Stability Certificate shall be submitted within one year from the expiry of a period of thirty years referred to in sub-section (*1*), and every ten years thereafter or such earlier period as the Commissioner may determine having regard to the condition of the building and the corrective repairs carried out by the owner or occupier.

(*3*) Notwithstanding anything contained in sub-section (*1*), the Commissioner may, at any time, after having recorded the reasons, in writing, direct the owner or occupier of a building, to cause such building to be examined by such Structural Engineer and to submit to the Commissioner, the Structural Stability Certificate, as required under sub-section (*1*), within

the period not exceeding thirty days as specified by the Commissioner, in such direction.

(*4*) If the Structural Engineer recommends any corrective repairs for securing the structural stability of the building, such corrective repairs shall be carried out by the owner or occupier of a building to the satisfaction of the Commissioner.

(*5*) Any owner or occupier, as the case may be, who fails to carry out corrective repairs for securing structural stability, within a period of six months from the date of report of the Structural Engineer, shall be punished with the fine as provided in section 471.

(*6*) Notwithstanding anything contained in sub-section (*5*), the Commissioner may, after giving the owner or occupier, a notice in writing, require him to carry out, within the period specified in the notice, corrective repairs for securing structural stability of a building. If the owner or occupier fails to carry out such corrective repairs within the period specified in the notice, the Commissioner may carry out the same and the expenses incurred by the Commissioner on such repairs shall, on demand if not paid within thirty days, be recovered from the owner or occupier as arrears of property tax.

(*7*) If there is any dispute about the amount of expenses for which demand is made under sub-section (*6*), an appeal may be preferred to the Chief Judge of the Small Causes Court, but no such appeal shall be entertained by the said Chief Judge, unless—

(*i*) it is preferred within twenty-one days from the date of receipt of notice of such demand ;

(*ii*) the amount for which demand is made is deposited with the Corporation and a true copy of the receipt showing that the amount has been so deposited accompanies the appeal.

(*8*) In case the appeal is decided in favour of the appellant and the amount of expenses deposited with the Corporation is more than the amount payable by the appellant, the Commissioner shall adjust the excess amount with interest at 6.25 per cent. per annum from the date on which the amount is so deposited by the appellant, towards the property tax payable by the owner in respect of such building thereafter. ".

Amendment of section 471 of Bom. III of 1888.

**3.** In the Table to section 471 of the Mumbai Corporation Act, after entry 85, the following entry shall be inserted, namely :—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| " 85A | Section 353B | Provisions as to Structural Stability Certificate | Twenty-five thousand rupees or the amount equal to property tax of the building, for a period of one year, whichever is higher | Twenty-five thousand rupees or the amount equal to property tax of the building for a period of one year, whichever is higher ". |

## CHAPTER III

### AMENDMENTS TO THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949.

Insertion of section 265A in Bom. LIX of 1949.

**4.** After section 265 of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 (hereinafter referred to as " the Provincial Corporations Act "), the following section shall be inserted, namely :— Bom. LIX of 1949.

Structural Stability Certificate.

" **265A.** (*1*) Notwithstanding anything contained in section 265, every owner or occupier of a building in respect of which a period of thirty years, from the date of,—

(*i*) issue of its completion certificate by the Corporation ; or

(*ii*) issue of permission to occupy a building under section 263 ; or

(*iii*) its physical occupation of at least 50 per cent. of its builtup area,

whichever is earlier, has expired, shall cause such building to be examined by a Structural Engineer registered with the Corporation for the purposes of certifying that the building is fit for human habitation (such certificate hereinafter referred to as " the Structural Stability Certificate "). The Structural Stability Certificate issued by such Structural Engineer shall be submitted to the Commissioner.

(*2*) The Structural Stability Certificate shall be submitted within one year from the expiry of a period of thirty years referred to in sub-section (*1*), and every ten years thereafter or such earlier period as the

Commissioner may determine having regard to the condition of the building and the corrective repairs carried out by the owner or occupier.

(*3*) Notwithstanding anything contained in sub-section (*1*), the Commissioner may, at any time, after having recorded the reasons, in writing, direct the owner or occupier of a building, to cause such building to be examined by such Structural Engineer and to submit to the Commissioner, the Structural Stability Certificate, as required under sub-section (*1*), within the period not exceeding thirty days as specified by the Commissioner in such direction.

(*4*) If the Structural Engineer recommends any corrective repairs for securing the structural stability of the building, such corrective repairs shall be carried out by the owner or occupier of a building to the satisfaction of the Commissioner.

(*5*) Any owner or occupier, as the case may be, who fails to carry out corrective repairs for securing structural stability, within a period of six months from the date of report of the Structural Engineer, shall be punished with the fine as provided in section 398A.

(*6*) Notwithstanding anything contained in sub-section (*5*), the Commissioner may, after giving the owner or occupier, a notice in writing, require him to carry out, within the period specified in the notice, corrective repairs for securing structural stability of a building. If the owner or occupier fails to carry out such corrective repairs within the period specified in the notice, the Commissioner may carry out the same and the expenses incurred by the Commissioner on such repairs shall, on demand, if not paid within thirty days, be recovered from the owner or occupier as arrears of property tax.

(*7*) If there is any dispute about the amount of expenses for which demand is made under sub-section (*6*), an appeal may be preferred to the Judge, before whom an appeal may be filed under section 406 of this Act, but no such appeal shall be entertained by the such Judge, unless—

(*i*) it is preferred within twenty-one days from the date of receipt of notice of such demand;

(*ii*) the amount for which demand is made is deposited with the Corporation and a true copy

of the receipt showing that the amount has been so deposited accompanies the appeal.

(8) In case the appeal is decided in favour of the appellant and the amount of expenses deposited with the Corporation is more than the amount payable by the appellant, the Commissioner shall adjust the excess amount with interest at 6.25 per cent. per annum from the date on which the amount is so deposited by the appellant, towards the property tax payable by the owner in respect of such building thereafter.".

Insertion of section 398A in Bom. LIX of 1949.

**5.** After section 398 of the Provincial Corporations Act, the following section shall be inserted, namely :—

Penalty for contravention of section 265A.

"**398A.** Wheever contravenes the provisions of section 265A, shall be punished with fine of twenty-five thousand rupees or an amount equal to the property tax of the building concerned for a period of one year, whichever is higher.".

## CHAPTER IV

### AMENDMENTS TO THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948.

Insertion of section 286A in C.P. and Berar II of 1950.

**6.** After section 286 of the City of Nagpur Corporation Act, 1948 (hereinafter referred to as "the Nagpur Corporation Act"), the following section shall be inserted, namely :— C.P. and Berar II of 1950.

Structural Stability Certificate.

"**286A.** (*1*) Every owner or occupier of a building in respect of which a period of thirty years, from the date of,—

(*i*) issue of its completion certificate by the Corporation ; or

(*ii*) issue of permission to occupy a building under section 280 ; or

(*iii*) its physical occupation of at least 50 per cent. of its builtup area,

whichever is earlier, has expired, shall cause such building to be examined by a Structural Engineer registered with the Corporation for the purposes of certifying that the building is fit for human habitation (such certificate hereinafter referred to as "the Structural Stability Certificate"). The Structural Stability Certificate issued by such Structural Engineer shall be submitted to the Commissioner.

(*2*) The Structural Stability Certificate shall be submitted within one year from the expiry of a period of thirty years referred to in sub-section (*1*), and every ten years thereafter or such earlier period as the Commissioner may determine having regard to the condition of the building and the corrective repairs carried out by the owner or occupier.

(*3*) Notwithstanding anything contained in sub-section (*1*), the Commissioner may, at any time, after having recorded the reasons, in writing, direct the owner or occupier of a building, to cause such building to be examined by such Structural Engineer and to submit to the Commissioner, the Structural Stability Certificate, as required under sub-section (*1*), within the period not exceeding thirty days as specified by the Commissioner in such direction.

(*4*) If the Structural Engineer recommends any corrective repairs for securing the structural stability of the building, such corrective repairs shall be carried out by the owner or occupier of a building to the satisfaction of the Commissioner.

(*5*) Any owner or occupier, as the case may be, who fails to carry out corrective repairs for securing structural stability, within a period of six months from the date of report of the Structural Engineer, shall be punished with the fine as provided in sub-section (*2*) of section 421.

(*6*) Notwithstanding anything contained in sub-section (*5*); the Commissioner may, after giving the owner or occupier, a notice in writing, require him to carry out, within the period specified in the notice, corrective repairs for securing structural stability of a building. If the owner or occupier fails to carry out such corrective repairs within the period specified in the notice the Commissioner may carry out the same and the expenses incurred by the Commissioner on such repairs shall, on demand if not paid within thirty days, be recovered from the owner or occupier as arrears of property tax.

(*7*) If there is any dispute about the amount of expenses for which demand is made under sub-section (*6*), an appeal may be preferred to the District Court, but no such appeal shall be entertained by the said Court, unless—

(*i*) it is preferred within twenty-one days from the date of receipt of notice of such demand.

(*ii*) the amount for which demand is made is deposited with the Corporation and a true copy of the receipt showing that the amount has been so deposited accompanies the appeal.

(*8*) In case the appeal is decided in favour of the appellant and the amount of expenses deposited with the Corporation is more than the amount payable by the appellant, the Commissioner shall adjust the excess amount with interest at 6.25 per cent. per annum from the date on which the amount is so deposited by the appellant, towards the property tax payable by the owner in respect of such building thereafter.".

Amendment of section 421 of C.P. and Berar II of 1950.

**7.** In section 421 of the Nagpur Corporation Act, in sub-section (*2*), in the Table after entry relating to section 280, sub-section (*4*), the following entry shall be inserted, namely :—

| | | | |
|---|---|---|---|
| "286A | Provisions as to Structural Stability Certificate | Twenty thousand rupees or the amount equal to property tax of the building for a period of one year, whichever is higher. | ..........". |

## CHAPTER V

AMENDMENT TO THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

Insertion of section 193A in Mah. XL of 1965.

**8.** After section 193 of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965, the following section shall be inserted, namely :— Mah. XL of 1965.

Structural Stability Certificate.

"**193A.** (*1*) Every owner or occupier of a building in respect of which a period of thirty years, from the date of,—

(*i*) issue of its completion certificate by the Council ; or

(*ii*) issue of permission to occupy a building under section 193 ; or

(*iii*) its physical occupation of at least 50 per cent. of its built up area,

whichever is earlier, has expired, shall cause such building to be examined by a Structural Engineer registered with the Council for the purposes of certifying that the building is fit for human habitation (such certificate hereinafter referred to as "the Structural Stability Certificate"). The Structural Stability Certificate issued by such Structural Engineer shall be submitted to the Chief Officer.

(*2*) The Structural Stability Certificate shall be submitted within one year from the expiry of a period of thirty years referred to in sub-section (*1*), and every ten years thereafter or such earlier period as the Chief Officer may determine having regard to the condition of the building and the corrective repairs carried out by the owner or occupier.

(*3*) Notwithstanding anything contained in sub-section (*1*), the Chief Officer may, at any time, after having recorded the reasons, in writing, direct the owner or occupier of a building, to cause such building to be examined by such Structural Engineer and to submit to the Chief Officer, the Structural Stability Certificate, as required under sub-section (*1*), within the period not exceeding thirty days as specified by the Chief Officer in such direction.

(*4*) If the Structural Engineer recommends any corrective repairs for securing the structural stability of the building, such corrective repairs shall be carried out by the owner or occupier of a building to the satisfaction of the Chief Officer.

(*5*) Any owner or occupier, as the case may be, who fails to carry out corrective repairs for securing structural stability, within a period of six months from the date of report of the Structural Engineer, shall be punished with the fine of rupees ten thousand or an amount equal to the property tax of the building for a period of one year, whichever is higher.

(*6*) Notwithstanding anything contained in sub-section (*5*), the Chief Officer may, after giving the owner or occupier, a notice in writing, require him to carry out, within the period specified, in the notice, corrective repairs for securing structural stability of a building. If the owner or occupier fails to carry out such corrective repairs within the period specified in the notice, the Chief Officer may carry

out the same and the expenses incurred by the Chief Officer on such repairs shall, on demand, if not paid within thirty days, be recovered from the owner or occupier as arrears of property tax.

(*7*) If there is any dispute about the amount of expenses for which demand is made under sub-section (*6*), an appeal may be preferred by the owner to the Propety Tax Appeal Committee constituted under sub-section (*2*) of section 169 of this Act, but no such appeal shall be entertained by the said Committee, unless—

(*i*) it is preferred within twenty-one days from the date of receipt of notice of such demand;

(*ii*) the amount for which demand is made is deposited with the Council and a true copy of the receipt showing that the amount has been so deposited accompanies the appeal.

(*8*) In case the appeal is decided in favour of the appellant and the amount of expenses deposited with the Council is more than the amount payable by the appellant, the Chief Officer shall adjust the excess amount with interest at 6.25 per cent. per annum from the date on which the amount is so deposited by the appellant, towards the property tax payable by the owner in respect of such building thereafter.".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.